दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक २८७ । शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

**सुट्टीची सूचना**

स्वातंत्र दिनानिमित्त 'दैनिक आकर्षण' कार्यालयास शनिवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी सुट्टी असल्याने या दिवशीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

सर्वांना स्वातंत्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

- संपादक

## हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस दाखल करणाऱ्या वैभव कलुबर्मे, दिलीप टिपरसे यांना तातडीने बडतर्फ करा

### आमदार संग्राम जगताप यांची मुंबई येथे पत्रकार परिषदेत मागणी । धीरज परदेशी खून प्रकरणी नगरच्या पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यभरात गाजत असलेल्या नगरमधील महापलिकेचा कंत्राटी कामगार धीरज परदेशी खून प्रकरणी आमदार संग्राम जगताप यांनी शुक्रवारी मुंबई येथे पत्रकार परिषद घेऊन भूमिका व्यक्त करताना पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप केले. या घटनेच्या बाबतीत आमचा आता पोलिसांवर विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे आयजी व डीआयजी यांनी वाटल्यास वेगळ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती या प्रकरणी केली तरच योग्य दिशेने तपास जाईल, असेही जगताप म्हणाले.

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना जगताप म्हणाले की, धीरज परदेशी खून प्रकरणाची खरी घटना व त्यामागील आमच्या भावना राज्य सरकारपर्यंत पोहोचाव्यात व पीडित कुटुंबीयांना त्वरित न्याय मिळावा यासाठी मुंबईत पत्रकार परिषद घेत आहे. याप्रकरणी नगरच्या पोलीस प्रशासनाची भूमिका संशयास्पद आहे. घटना घडल्यानंतर हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचा आवाज पोलीस दाबत असून त्यांच्यावर अनेक खोटे गुन्हे



दाखल करत या प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न चालवला आहे. अद्याप मुख्य आरोपी कोण आहेत हे निष्पन्न केले नसून त्यांना अटकही केलेली नाही. जे आरोपी अटक केले ते मारेकऱ्यांना मदत करणारे आरोपी पकडले आहेत. पोलीस अधिकारी प्रमुख आरोपींना पाठीशी घालत आहे का? अशी शंका व्यक्त करून आमदार जगताप म्हणाले की, हिंदुत्ववाद्यांवर खोट्या केसेस दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना तातडीने बडतर्फ करण्यात यावे, पीडित परदेशी कुटुंबाला त्वरित न्याय मिळावा, अशी मागणी आमदार जगताप यांनी यावेळी केली.

**बुलडोझर कारवाई त्वरीत करा, चांगल्या वकिलाची नियुक्ती करा**

नगरचे पोलीस अधिकारी ही घटना वेगळ्या मार्गावर नेण्याच्या प्रयत्नात आहेत. याला वाचा फुटावी, न्याय मिळाला यासाठी लवकरच राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहोत, असे सांगून आमदार जगताप म्हणाले की, आरोपींची अनाधिकृत घरे पाडण्याच्या आदेशाला आरोपींनी लावलेली स्थगिती ताबडतोब उठवावी व घर पडण्याची कारवाई त्वरित करावी, धीरजच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा होण्यासाठी चांगल्यातल्या चांगला सरकारी वकीलाची नियुक्ती करावी, धीरजच्या पत्नी मागे आम्ही हिंदुत्ववादी सर्वजण खंबीरपणे उभे आहोतच पण त्यांना शासनानेही सन्मान जनक नोकरी देणे आवश्यक आहे, अशा मागण्या मुख्यमंत्र्यांना भेटून करणार आहोत.

### बोल्हेगाव रेखांकन सनद रद्द प्रकरण

## जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बोल्हेगाव येथील सर्वे नंबर १९/७२४/२३०/१ मधील जमिनीच्या रेखांकनास तहसीलदारांकडून देण्यात आलेली सनद रद्द करण्याबाबतच्या निवेदनावर कारवाई करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. या प्रलंबित निवेदनावर निर्णय घेण्यासाठी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आपला स्पष्ट अभिप्राय व अहवाल विभागीय आयुक्तांकडे त्वरित सादर करावा, असे आदेश न्यायमूर्ती एन. बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती ए. डी. शिंदे यांच्या खंडपीठाने दिले आहेत.

बोल्हेगाव येथील जमिनीच्या रेखांकनाबाबत तक्रारदार यशवंत सोन्याबापू धामणे यांनी महसूल व वनविभागाकडे निवेदन दिले होते. या निवेदनात विजय विष्णू प्रसाद मर्दा, मयूर वसंतलाल सिटीया व हर्षल संतोष भंडारी यांनी महसूल अधिकाऱ्यांशी संगनमत करून स्वतःच्या आर्थिक लाभासाठी पदाचा गैरवापर केला, तसेच शासन व अर्जदाराची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला होता. या तक्रारीच्या अनुषंगाने नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त व अप्पर आयुक्त (महसूल) यांनी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाचा अंतिम व मुद्देनिहाय अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, वारंवार स्मरणपत्र देऊनही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे अखेर यशवंत धामणे यांनी ॲड. एन. बी. नरवडे यांच्यामार्फत औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली. याचिका ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना प्रलंबित तक्रारीचा अहवाल विभागीय आयुक्तांकडे त्वरित सादर करण्याचे स्पष्ट निर्दे श दिले. या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. एन. बी. नरवडे यांनी बाजू मांडली.

## फसवणुकीच्या गुन्ह्यात जामीन फेटाळल्यानंतर फरार झालेला आरोपी एलसीबीकडून जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** घर घेऊन देण्याच्या बहाण्याने ६ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करून जामीन फेटाळल्यानंतर फरार झालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने यशस्वीरीत्या जेरबंद केले आहे. संकेत राजेंद्र भोसले (वय ३०, रा. पिंपळगाव माळवी, ता. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत राजेश्वर मनोहर भोसले (रा. बालिकाश्रम रोड, सुडके मळा) यांना घर घेऊन देतो असे सांगून आरोपी संकेत भोसले याने ऑनलाईन व रोख स्वरूपात ६ लाख ५० हजार रुपये उकळले होते. पैसे घेतल्यानंतरही घर न देता आणि पैसे परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान आरोपीने न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. परंतु, न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आरोपी फरार झाला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस



निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार संदीप पवार, शाहीद शेख आणि गणेश धोत्रे यांचे विशेष पथक तयार करून आरोपीच्या शोधासाठी रवाना केले. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने १३ ऑगस्ट रोजी भिस्तबाग महाल (तपोवन रोड) परिसरातून आरोपीला ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी त्यास तोफखाना पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

## सुमन काळे मृत्यू प्रकरणाचा एसआयटीमार्फत होणार तपास

### तीन महिन्यांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर येथील बहुचर्चित सुमन काळे मृत्यू प्रकरणाचा तपास आता एसआयटीमार्फत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली. या पथकाला तीन महिन्यांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सतरा वर्षांपूर्वी, सन २००९ मध्ये नगर शहरात ही घटना घडली होती. नगरमधील दरोडा प्रतिबंधक पथकाचे प्रमुख तत्कालीन पोलीस उपअधीक्षक सोमनाथ घार्गे हे होते. या पथकाने चौकशी कामी पारधी समाजातील सुमन काळे हिला ताब्यात घेतले होते. चौकशी दरम्यान पोलिसांकडून तिला जबर मारहाण झाली होती. तिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, तेथे तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तत्कालीन पोलीस निरीक्षक तुकाराम वहिले, देवीदास सोनवणे यांच्यासह दहा ते बारा पोलिसांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.



त्यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून सुनील रामानंद कार्यरत होते.

दरम्यानच्या काळात सुनील रामानंद हे सीआयडीला बराच काळ राहिल्याने गुन्ह्याचा तपास चांगल्या प्रकारे झाला नसल्याचा आरोप सुमन काळेच्या कुटुंबीयांनी केला होता. या प्रकरणी संबंधित दोषी पोलीस अधिकारी–कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी, यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुमन काळेचे कुटुंबीय प्रशासनाचे उंबरठे झिजवत आहेत. सदर प्रकरणी थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत कुटुंबीयांनी दाद मागितलेली आहे.श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी अधिवेशनात सुमन काळे मृत्यू प्रकरण उपस्थित करून प्रकरणाचा तपास एसआयटीकडे देण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रशासकीय पातळीवर कार्यवाहीला वेग येऊन अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापनेची घोषणा केली. त्यानुसार १३ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक लखमी गौतम (कायदा व सुव्यवस्था) यांनी यासंदर्भातील आदेश काढले.

**सुधीर हिरेमठ पथकाचे प्रमुख**

या पथकाचे प्रमुख म्हणून विशेष पोलीस महानिरीक्षक (पुणे पश्चिम) सुधीर हिरेमठ काम पाहणार आहेत. तसेच या पथकावर देखरेख ठेवण्यसाठी अप्पर पोलीस महासंचालक (महामार्ग सुरक्षा) प्रवीण साळुंके यांची नेमणूक करण्यात आली आहे. या विशेष पथकाला तीन महिन्यांच्या आत या गुन्ह्याचा तपास तसेच सुमन काळे मृत्यू संदर्भातील सर्व अर्ज प्रकरणे यांची चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## जायकवाडी धरण तिरंग्याच्या रोषणाईने उजळले!

### स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर नयनरम्य दृश्य; नागरिकांचे लक्ष वेधले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा होत असताना मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या जायकवाडी धरणाला तिरंग्याच्या रंगांची आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. रात्रीच्या अंधारात तिरंग्याच्या रंगांनी उजळलेले धरण पाहण्यासाठी नागरिकांचे लक्ष वेधले जात आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जायकवाडी धरणाची करण्यात आलेली ही आकर्षक सजावट परिसराच्या ■ पान ४ वर





## जेऊर बायजाबाई येथे दीड लाखाचा मावा जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने जेऊर बायजाबाई (ता. नगर) परिसरात छापा टाकून सुगंधी तंबाखू आणि सुपारीपासून मावा तयार करणाऱ्यावर कारवाई करून १ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखालील पथक एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, शशिकांत मगर नामक व्यक्ती आपल्या घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये सुगंधी तंबाखू व सुपारीचे मिश्रण करून मावा विकत असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी धाड टाकली. या कारवाईदरम्यान घटनास्थळावरून बबल बापू ससे (वय २३, रा. आठरे वस्ती, ससेवाडी, ता. अहिल्यानगर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ३० हजार रुपये किमतीचा १५ किलो तयार मावा, ६३ हजार रुपयांचा ९० किलो सुपारीचा चुरा आणि ४८ हजार रुपयांची

### पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करा

## अहिल्यानगरमध्ये बँक कर्मचाऱ्यांची निदर्शने




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाच दिवसीय बँकिंग आठवडा लागू करण्याच्या प्रलंबित मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी, 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स'च्या देशव्यापी आवाहनानुसार अहिल्यानगरमधील बँक कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली. प्रोफेसर चौक येथील युनियन बँकेसमोर झालेल्या या निदर्शनांमध्ये शहरातील सर्व बँकांमधील बहुसंख्य कर्मचारी आणि अधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या आंदोलनात महिला बँक कर्मचाऱ्यांचा सहभाग लक्षणीय होता.

बाराव्या द्विपक्षीय करारात (१२ ) इंडियन बँक्स असोसिएशनने () पाच दिवसीय बँकिंग तत्त्वतः मान्य करूनही, केंद्र सरकारकडून यावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. सरकारच्या ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### कवी दत्तात्रय वारकड यांना राज्यस्तरीय ''संत ज्ञानेश्वर माऊली संत साहित्य पुरस्कार२०२६'' जाहीर



अहिल्यानगर -प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड यांनी आजपावेतो विविध वृत्तपत्रांमधून यांचे लेख प्रकाशित झाले असून आकाशवाणी केंद्रावर त्याची विविध व्याख्याने गाजलेली आहेत.सध्याच्या नवीन पिढीतील... विद्यार्थ्यांना संताविषयी ज्ञान मिळावे या अनुशंगाने विविध शाळा, कॉलेज येथे जावून ते विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने आयोजित करत आहेत. या मागे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी व थोर महापुरूष संत, महंत यांच्या व्यक्तीचरीत्राची ओळख पटावी व विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणावा व आपले जीवन सुजलाम सफलम बनवावे हाच मुलभूत हेतु आहे. आजपर्यंत अहिल्या नगर जिल्हा सह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातही १००० पेक्षा अधिक व्याख्यानं त्यांनी दिली आहेत. त्यांचा विषय आहे. ''संत श्री ज्ञानेश्वर माऊली'' यांची ज्ञानज्योत अखिल विश्वाला अखंडित महा ऊर्जेचे प्रेरणा स्त्रोत ! त्याचबरोबर आजचा युवक व त्याच्या समोरील आव्हाने, आनंदी जीवन आयुष्याचा आनंद उत्सव व्यक्तिमत्व विकास, अशा विविध विषयावरती समाजामध्ये ते प्रबोधन करतात.त्यांच्या या समाज उपयोगी कार्याची दखल घेत आळंदी,दि.२३ऑगस्ट २०२६ के. एस. आय. पब्लिकेशन्स, कोल्हापूर (मु.पो. इंगळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या वतीने आळंदी येथे आयोजित ३० वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या संमेलनात विविध साहित्यिक,कवी, लेखक, समीक्षक व साहित्यप्रेमी राज्यभरातून सहभागी होणार आहेत. या वर्षीचे 'राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली साहित्य पुरस्कार २०२६ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार .कवी लेखक व प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड अहिल्यानगर यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.यांचे साहित्य क्षेत्रात निः स्वार्थ भावनेने,संवेदनशील लेखनशैलीने, सामाजिक जाणीव व साहित्यनिष्ठा जपत सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या सृजनशील साहित्यकृती समाजमनाला विचारप्रवृत्त करणाऱ्या असून साहित्यविश्वात त्यांनी स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यसेवेचा गौरव म्हणून त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार प्रदान करताना त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करण्यात येणार असून त्यांच्या पुढील साहित्य प्रवासासाठी के.एस. आय.पब्लिकेशन्स,कोल्हापूर यांच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.

## अहिल्यानगर फॅशन रनवेसाठी शनिवारी मेगा ऑडिशन

### अहिल्यादेवींच्या लेकींना सहभागासाठी आणखी एक सुवर्णसंधी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या देदीप्यमान इतिहासाचा वारसा लाभलेले अहिल्यानगर सांस्कृतिक, अध्यात्मिक दृष्ट्या समृद्ध परंपरा जपणारे आहे. अहिल्यादेवींचा आदर्श समोर ठेवून विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलाही शहराची शान आहेत. याच स्त्री शक्तीला स्वतःमधील सुप्त गुण जगासमोर आणण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडावी यासाठी नगरमध्ये अहिल्या सरस्वती महोत्सव साजरा होत आहे. यात अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६ आयोजित करण्यात आला आहे. पहिल्या ऑडिशनला मिळालेल्या प्रचंड प्रतिसाद आणि अहिल्यादेवींच्या आधुनिक काळातील लेकीचा आग्रह लक्षात घेऊन शनिवार दि. १५ ऑगस्ट रोजी आणखी एका ऑडिशनचे आयोजन करण्यात आले आहे.

नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे सकाळी ९ ते




सायंकाळी ५ यावेळेत हे ऑडिशन्स होणार आहे, अशी माहिती सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.अमोल जाधव यांनी दिली.

अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६ सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या पुढाकाराने होत असून मुख्य प्रायोजक महावीर ग्रुप (राजेश भंडारी) आहे. देशातील फॅशन विश्वातील अग्रगण्य फॅशन प्लॅटफॉर्म 'फॅशन कार्निव्हल'च्या माध्यमातून, ज्यांची मूळ संस्था कल्लाकार फॅक्टरीद्वारे हा महोत्सव संकल्पित व साकार करण्यात येत आहे.

९ ऑगस्ट रोजी झालेल्या पहिल्या ऑडिशनला संधी न मिळालेल्या युवती, महिलांना १५ ऑगस्टला दुसऱ्या ऑडिशनमध्ये सहभागी होता येणार आहे. पॅरेंट अ‍ॅण्ड मी वॉक, डॉक्टर्स वॉक, डिझायनर फॅशन रनवे (पारंपरिक व वेस्टर्न) आणि ८ वेगवेगळे रनवे सिक्वेन्स यात असतील. गर्भवती मातांसाठी ऑडिशन्स नसून त्यांना ९७३०२०८०९८ या मोबाईल क्रमांकावर थेट नोंदणी करता येईल. नवोदितांसाठी हा फॅशन रनवे मोठी संधी असून एक मोठे व्यासपीठ त्यांना नगरमध्येच मिळणार आहे. सहभागींना पोशाख, मेकअप, दागिने आणि प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध आहे.

अहिल्यानगर फॅशन रनवे मध्ये १६ वर्षांपुढील मुली, महिला सहभागी होऊ शकतील. फॅशन रनवेचा मुख्य इव्हेंट रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी नवीन टिळक रोडवरील पराडाईज हॉटेल मागील नंदनवन लॉन्स येथे होईल. यात फॅशन रनवे बरोबरच अहिल्या गौरव पुरस्कार, सरस्वती गौरव पुरस्कार वितरण, प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट अ‍ॅण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स होईल.

## जागतिक ग्रंथपाल दिन व अँटी रॅगिंग डे उत्साहात साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** के. जी.महाविद्यालयात जागतिक ग्रंथपाल दिन आणि अँटी रॅगिंग डे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात परिसर संचालिका माननीय डॉ. स्वाती मुनोत यांनी एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.जागतिक ग्रंथपाल दिनानिमित्त माननीय डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे महत्त्व, वाचनाची आवड आणि ग्रंथालयाचा योग्य वापर याबाबत तसेच विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके व संदर्भग्रंथांचा उपयोग करून ज्ञानवृद्धी करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच अँटी रॅगिंग डे निमित्त विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी कायदे, रॅगिंगचे दुष्परिणाम आणि महाविद्यालयातील रॅगिंगविरोधी नियम याबाबत माहिती देण्यात आली. महाविद्यालय रॅगिंगमुक्त ठेवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल सौ. हर्षाली रासकर यांनी केले.तसेच आभार प्रदर्शन प्रा. स्नेहल बोरावके यांनी केले यावेळी डॉ . वर्षा कीर्तने, डॉ. प्रशांत खोपटीकर, प्रा. योगेश चाकवते, प्रा. रोहिणी क्षीरसागर व विद्यार्थी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालया समोर आयटक–सीटूची निदर्शने

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा निषेध आणि विविध क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीआयटीयू/सीटू) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १० ऑगस्ट) अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ व कामगारविरोधी धोरणांविरोधात घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.

या आंदोलनात आयटकशी संलग्न अहिल्यानगर महानगरपालिकेतील आशा वर्कर, मोहटादेवी देवस्थान, मढी देवस्थान तसेच अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सीआयटीयूचे पदाधिकारी व कार्यकर्तेही आंदोलनात सहभागी झाले होते. आयटकचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा सेक्रेटरी अ‍ॅड. कॉ. सुधीर टोकेकर आणि सीआयटीयूचे प्रवीण सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलन झाले. यावेळी कॉ. सतीश पवार, कॉ. मारुती दहिफळे, सचदेव ईश्वर, कॉ. सुभाष शिंदे, कॉ. कन्हैया बुंदेले, कॉ. महादेव पालवे, तसेच आशा संघटनेच्या अहिल्यानगर महानगरपालिका अध्यक्षा स्वाती भनगे, तब्सुम तांबोळी, शितल कापरे, शेख रुकसाना, विजया वाघ, सुंदराबाई वाघ, मोनाली धूपदरे, योगिता थोरात, जयश्री कव्हाणे, शेख अफसाना यांच्यासह अनेक कामगार प्रतिनिधी व महिला कर्मचारी सहभागी झाल्या.

## लक्ष्मी आईच्या कृपेने गावात समृद्धी येवो- गोपीनाथ होळकर

### नेप्तीत लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात साजरी, पारंपरिक वाद्यांच्या गजरात रंगली मिरवणूक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती गावात श्रद्धा, एकता आणि परंपरेचा त्रिवेणी संगम पहायला मिळाला. गोपीनाथ होळकर यांनी गावातून लोकवर्गणी गोळा करून सर्वांना बरोबर घेऊन लक्ष्मीआई यात्रा उत्साह साजरी केली .

यात्रा कमिटीच्या वतीने यात्रेच्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली . लक्ष्मी आईच्या यात्रेनिमित्त लक्ष्मी आईचे मंदिर फुलांच्या माळांनी सजविले होते . ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक यात्रेचा मुख्य सोहळा असलेली मिरवणूक दुपारी ४ वाजता गावातून मोठ्या दिमाखात निघाली. मिरवणुकीच्या अग्रभागी संबळ, हलगी, ढोल आणि ताशा, सनई, वादकांनी वातावरण भारून गेले होते. पारंपरिक वेशभूषेतील पोतराजांनी अंगावर आसूड ओढत भक्तीचा नजराणा सादर केला. चट्ट... चट्ट... असा आवाज येताच संपूर्ण



परिसरात एकच जयघोष झाला.

मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात महिलांनी डोक्यावर कलश घेत सहभाग नोंदवला. हातात नारळ, पेढे आणि फुलांच्या ताटांसह महिला ''लक्ष्मीमाता की जय'' चा गजर करत चालत होत्या. पारंपरिक वाद्याच्या गजरात मिरवणूक गावातील मुख्य चौक, बाजारपेठ मार्गे मंदिरात आली. ग्रामस्थ व साळवे परिवाराच्या वतीने पोपट साळवे यांच्या हस्ते लक्ष्मीआईला गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा व महाआरती करण्यात आली . यावेळी ग्रामस्थांनी लक्ष्मी आईला चांगल्या पावसासाठी साकडे घातले. तसेच लक्ष्मी आईच्या मंदिराचे बांधकाम चालू असून दानशूर भाविकांनी व ग्रामस्थांनी मंदिराच्या कामासाठी सरळ हाताने मदत करावी असे आव्हान नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले . यात्रेला जुनी परंपरा असून दरवर्षी भाविक मोठ्या श्रद्धेने यात सहभागी होतात.

लक्ष्मी आई ही फक्त आपली कुलदेवता नाही, तर नेप्ती गावचा प्राण आहे. आज आपण सर्व जाती-धर्म विसरून एकत्र आलो, हेच या यात्रेचे खरे यश आहे.

## फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत चुरशीचा थरार; आर्मी पब्लिक स्कूल मुलींच्या अंतिम फेरीत

### प्रवरा पब्लिक स्कूलचा तीन सामन्यांत दमदार खेळ; सेंट मायकल स्कूलचीही विजयी आगेकूच



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर बुधवारी (दि. १२ ऑगस्ट) फुटबॉलप्रेमींना चुरशीच्या सामन्यांचा थरार अनुभवायला मिळाला. फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत विविध वयोगटांतील संघांनी मैदानावर कौशल्य, वेग आणि आक्रमक खेळाचे दर्शन घडविले. एका बाजूला प्रवरा पब्लिक स्कूलने प्रतिस्पर्ध्यांवर गोलचा वर्षाव करीत दमदार विजय मिळविले, तर सेंट मायकल स्कूलनेही प्रभावी कामगिरी करत विजयी आगेकूच केली. दरम्यान, १६ वर्षांखालील मुलींच्या उपांत्य सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने पोदार स्कूलचा ३-० असा पराभव करून अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. तर गुरुवार (दि.१३ ऑगस्ट) पासून मुलांच्या गटातील उपांत्यपूर्व फेरीचे सामने नॉक आऊट पध्दतीने खेळविण्यात येणार आहे. यामध्ये पराभव झालेला संघ स्पर्धेतून बाहेर होणार आहे.

सकाळच्या सत्रात १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल आणि प्रवरा पब्लिक स्कूल यांच्यात सामना झाला. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करणाऱ्या प्रवरा पब्लिक स्कूलने सामन्यावर वर्चस्व राखत ६-१ गोलने दणदणीत विजय मिळविला. प्रवरा पब्लिक स्कूलकडून प्रिन्स चंदन याने सामन्याच्या ५व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर त्यानेच ९व्या आणि २९व्या मिनिटाला गोल करत हॅट्ट्रिक नोंदविली. वरद चौहान याने ८व्या मिनिटाला गोल केला. कुणाल खाडे याने २५व्या मिनिटाला गोल करून संघाची आघाडी आणखी भक्कम केली. सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलकडून समीर खान याने ३२व्या मिनिटाला एकमेव गोल केला. त्यानंतर शेख याने ४२व्या मिनिटाला स्वयंगोल केल्याने प्रवरा पब्लिक स्कूलच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटातही सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल आणि प्रवरा पब्लिक स्कूल आमनेसामने आले. या सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करीत प्रतिस्पर्धी संघाला गोल करण्याची संधी दिली नाही. अखेर प्रवरा पब्लिक स्कूलने ६-० गोलने एकहाती विजय संपादन केला. मोहित चौधरी, वैभव कोटेकर, धीरज चारसकर व रोशन पवार याने प्रत्येकी १ गोल केला. तर युवराज आहेर याने २ गोल केले.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटातील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूल विरुद्ध प्रवरा पब्लिक स्कूल हा सामना मात्र अत्यंत अटीतटीचा झाला. दोन्ही संघांनी बचाव आणि आक्रमणाचा सुरेख समतोल साधत सामन्यात रंगत आणली. दुसऱ्या हाफमध्ये सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंटकडून माहिर गुंदेचा याने गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र प्रवरा पब्लिक स्कूलकडून प्रविण काळे याने ४९व्या मिनिटाला गोल करून सामन्यात बरोबरी साधली. त्यानंतर दोन्ही संघांनी निर्णायक गोल करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र शेवटपर्यंत कोणत्याही संघाला आघाडी घेता आली नाही. अखेर सामना १-१ गोलने बरोबरीत सुटला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूल आणि ऑर्किड स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात सेंट मायकल स्कूलने मैदानावर आपले वर्चस्व सिद्ध केले. सेंट मायकलने आक्रमक खेळाचे प्रदर्शन करीत ऑर्किड स्कूलचा ७-० गोलने एकतर्फी पराभव केला. सेंट मायकल स्कूलकडून शौर्य चंगेडिया याने ११व्या, ३५व्या आणि ३६व्या मिनिटाला गोल करून हॅट्ट्रिक नोंदविली. ऋषी पाटोळे याने ४२व्या आणि ४६व्या मिनिटाला दोन गोल केले. त्यानंतर नमीत फिरोदिया याने ४९व्या मिनिटाला गोल करून संघाच्या विजयात भर घातली.

## शब्दकोडे क्रमांक : २९



**आडवे शब्द :** १. गावी घरासमोर असणारी मोकळी जागा. ३. उत्तराखंड येथील एक प्रसिद्ध पवित्र स्थळ. ६. रात्री आकाशात चमकणारा ग्रह. ७. चपाती ज्यावर भाजतात ते साधन. ८. पतीची दुसरी पत्नी. ९. सर्प. १०. फरसाण-पोहे-चणे-शेंगदाणे-डाळ वापरून बनवतात तो खाद्य पदार्थ. ११. घड्याळाचे ठोके. १३. छत. १६. संध्याकाळ. १७. वावर. १९. उंच नसलेला. २१. दंगा. २३. सुकलेले खजूर. २५. लखनवी सरदार. २६. माराचे वण. २७. रती क्रिडा. २९. रव्यापासून बनवलेला गोड सांजा. ३२. अकरावा मराठी महिना. ३३. हिंदीत-संधी. ३४. ठेकेदार. ३६. हिंदीत-परकी. ३९. लक्ष्मी. ४१. रट-उलट लिहा. ४२. हिंदीत-स्वप्न. ४३. रतून. ४४. उजाड. ४७. गोधडी. ४८. एक संदेश झाडे - - झाडे जगवा. ४९. गुरांचा घोळका. ५०. शेंगाच्या साली. ५१. रस्ता. ५२. मामाची बायको. **उभे शब्द :** १. फरक. २. रानरेडा. ३. एक सुवासिक फूल. ४. दंत. ५. उदास. ६. चटकन तापणारा. ८. आवडीच्या कामासाठी काढलेला वेळ. ११. स्त्रियांनी केसात माळावयाची पुष्पमाला. १२. दाणेदार सांजा. १४. नात्यात नसलेला. १५. भारतात ज्या ठिकाणी अणूबाँब चाचणी झाली ते ठिकाण. १८. मित्र. २०. लग्न. २२. डाव्या हाताने खेळणारा. २४. दोरी. २७. पराक्रम. २८. यमाची बहीण. २९. सावज. ३०. कुठल्याही बंधनात नसलेला. ३१. दर. ३५. सुगंध. ३७. हिंदीत-रात्र. ३८. कोणतेही काम तत्परतेने करणारा. ४०. संगीतातील एक राग. ४२. सर्व. ४५. नीरस. ४६. घर बांधण्यासाठी रचतात ती. ४७. बाष्प. ४८. पाय. ४९. जास्त-विरुद्ध.

### शब्दकोडे क्रमांक : २८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | त | रा | ळ | | भ | ड | क | | सा | ध | क |
| त | | न | | सं | ग | | र | य | त | | वा |
| | खा | टी | क | | वा | घ | | स | | पा | य |
| धी | र | | व | ही | | न | भ | | का | | त |
| | ट | हा | ळी | | पी | | री | त | स | र | |
| वि | | व | | भ | र | धा | व | | व | हा | ण |
| रा | धा | | मा | य | | म | | का | | ट | |
| ट | | मै | ल | | मैं | | ह | स | रा | | रा |
| | दा | दा | | तु | | व | ज | | त | ला | व |
| रा | स | | सा | र | वा | सा | र | व | | ड | |
| घ | | ख | व | ट | | ह | | टी | न | | ख |
| व | न | रा | ज | | स | त | त | | फा | फ | डा |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)


The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### भातोडी पारगांवच्या श्री नृसिंह मंदिर येथे महाप्रसादाचे १५ रोजी आयोजन

अहिल्यानगर : येथील श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर, भातोडी (पारगांव) ता. नगर हे अत्यंत जागृत व स्वयंभू तीर्थक्षेत्र आहे. मंदिराचे दगडी कोरीव बांधकाम अत्यंत पुरातन व देखणे आहे. मेहेकरी नदीच्या तीरावर वसलेल्या व निसर्गरम्य ठिकाणी उद्या श्रावणी शनिवारनिमित्त (दि. १५) रोजी धार्मिक कार्यक्रम व विशाल महाप्रसादाचे आयोजन श्री नृसिंह स्वामी सेवा समितीच्यावतीने करण्यात आले आहे. सकाळी ११.०० वाजता अभिषेक श्री. राजू विद्ये व सौ. सुरेखाताई विद्ये, मा. चेअरमन, अहमदनगर शहर सहकारी बँक, मा. नगरसेविका म.न.पा. अहमदनगर यांच्या हस्ते दुपारी १.०० वाजता महाआरती व विशाल महाप्रसाद शुभारंभ आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर श्री. ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, अशी विनंती श्री नृसिंह स्वामी सेवा समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

### वयाच्या ७५ व्या वर्षी प्रा. कुंदा हळबे यांनी मिळवली पीएच.डी.



अहिल्यानगर- प. पू. डॉ. हेडगेवार शैक्षणिक संकुल, विद्या प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय व संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थी प्रा. कुंदा हळबे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी दि. १० ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आली. वयाच्या ७५व्या वर्षी पीएच.डी. पदवी संपादन करून प्रा. हळबे यांनी विद्यार्थ्यांसह सर्वांसमोर शिक्षणाची अखंड साधना आणि जिद्दीचे प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. प्रा. कुंदा हळबे यांनी इंग्लिश मीडियम स्कूल, डी.एड. कॉलेज तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्राचार्य म्हणून प्रदीर्घ काळ कार्य केले आहे. सेवानिवृत्तीनंतर जवळपास पंधरा वर्षांनी त्यांनी पीएच.डी. संशोधन कार्यास सुरुवात केली. वयाच्या ७५व्या वर्षी पीएच.डी. चे संशोधन कार्य पूर्ण करणे ही त्यांच्या जिद्दीची, चिकाटीची आणि कठोर परिश्रमाची प्रेरणादायी कहाणी आहे. त्यांच्या या यशामुळे वय हे शिक्षण आणि ज्ञानार्जनासाठी अडथळा नसून इच्छाशक्ती, सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, हा संदेश समाजास मिळाला आहे. प्रा. हळबे यांनी आपल्या पीएच.डी.च्या संशोधन कार्याची सुरुवात डॉ. आश्लेषा भंडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली. त्यानंतर माजी प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे यांच्या मार्गदर्शनाने संशोधन कार्य पुढे नेले. पुढे डॉ. अविनाश भांडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण केले. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय दादाराम ढवाण , कार्यवाह माननीय सोमनाथ दिघे, सहकार्यवाह तथा माजी प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे, सर्व संस्थाचालक, प्राचार्य डॉ. शिवाजी देसाई, सर्व प्राध्यापक, सहकारी तसेच समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांनी प्रा. कुंदा हळबे यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### पाणीपुरवठ्यातील अनियमितते विरोधात मनपा सेवानिवृत्त कर्मचारी ज्येष्ठ नागरिक भांबरे यांचा १५ ऑगस्टला उपोषणाचा इशारा



अहिल्यानगर- महानगरपालिकेच्या टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात अनियमितता, कथित भ्रष्टाचार व नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत मनपा सेवानिवृत्त कर्मचारी ज्येष्ठ नागरिक दिलीपकुमार भांबरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मागण्यांवर दि. १४ ऑगस्टपर्यंत कार्यवाही न झाल्यास स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता मनपा गेटजवळ आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे . निवेदनानुसार, नालेगाव परिसरातील नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून, टँकर व्यवस्थेत गैरप्रकार होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पाणीपुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी करूनही मनपाच्या वतीने कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तसेच माहिती अधिकारांतर्गत मागविलेली माहितीही अपूर्ण स्वरूपात मिळाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.टँकर व्यवस्थेतील कथित गैरप्रकाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी, संबंधित टँकरचालकावर व टँकर व्यवस्था पहानारे लिपीक यांच्यावर कारवाई करावी, तसेच पाणीवाटपासाठी कायमस्वरूपी टँकरची व्यवस्था करून वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा करावा, अशा प्रमुख मागण्या त्यांनी केल्या आहेत.

## ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये नव्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दि. १०आणि११ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवशीय इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नव्याने प्रवेशित पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी परिचित करून देणे, विविध विभागांची माहिती देणे तसेच शैक्षणिक, सहशैक्षणिक व विद्यार्थी विकासाच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागत समारंभ व शैक्षणिक माहिती सत्र घेण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. एकनाथराव ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी शिक्षणासोबत कौशल्यविकास, शिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास, आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा. महाविद्यालयातील उपलब्ध शैक्षणिक सुविधांचा व विविध उपक्रमांचा जास्तीत जास्त लाभ घेऊन उज्वल भवितव्य घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख, शैक्षणिक पद्धती, महाविद्यालयीन शिस्त तसेच प्रथम सत्रातील शैक्षणिक बाबींची माहिती देण्यात आली. संगणक अभियांत्रिकी विभागाची माहिती प्रा. संदीप बोराळे यांनी, तर सिव्हिल अभियांत्रिकी विभागाची माहिती प्रा. संपदा उरणकर यांनी दिली. त्यानंतर शिष्यवृत्तीविषयक मार्गदर्शन प्रा. आर. एच. अत्तार यांनी केले. तसेच विविध समित्या, अतिरिक्त सहशैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यानंतर यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाची माहिती प्रा. किशोर बटुळे प्राध्यापक विश्वास घु टी विद्युत अभियांत्रिकी विभागाची माहिती प्रा. आर. डी. जाधव, तर प्रा. जगदीश दळे यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक व विभागीय मार्गदर्शन केले. विविध विभागांच्या अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक व करिअरविषयक संधींबाबतही माहिती देण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना कॉलेजच्या वतीने पेन भेट स्वरूपात वेलकम डे म्हणून देण्यात आला.

या दोन दिवसीयइंडक्शन कार्यक्रमामुळे नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण, विविध विभाग, शिक्षकवर्ग, शिष्यवृत्ती, प्रशिक्षण व प्लेसमेंट तसेच विविध सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक प्रवासाची सकारात्मक, आत्मविश्वासपूर्ण व प्रेरणादायी सुरुवात या कार्यक्रमातून झाली. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## बी.पी.एच. ई. सोसायटीच्या आयएमएस शिक्षण संस्थेत बी. बी. ए. व बी.सी.ए. प्रवेश प्रक्रियेला उत्तम प्रतिसाद




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने सन २०२६–२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असुन बी. बी. ए. व बी.सी.ए. या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमाला आय. एम. एस. संस्थेत उत्तम प्रतिसाद – मिळत असल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. प्रणोती तेलोरे यांनी दिली. विद्यार्थ्यांचे स्वागत प्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी डॉ. एम.बी.मेहता, संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, कार्यालीन अधीक्षक् महेश दीक्षित , लेखापाल नरेंद्र कदम, दिपक तुंगार, अश्विनी येळीकर, अनुश्री गुंफेकर, किरण साबळे, सी. डी. मोहिते, सॅम्यूअल उजागरे व इतर सदस्य उपस्थित होते.

शासनाच्या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून ऑनलाईन पध्दतीने सर्व सोपस्कार राबविले जातात. प्रवेश प्रक्रियेचा फॉर्म भरण्यापासुन फी भरे पर्यंत सर्व सुविधा ऑनलाईन आहेत. ही प्रकिया पुर्ण झाल्यानंतर प्रशासन विभागाच्या वतीने प्रक्रिया पूर्ण झाल्याचे पत्र, पुष्प, सॅक (बॅग) देऊन मुलांचे स्वागत केले जाते.

प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक हॅंडआउट तयार केला आहे की जे आय. एम. एस. मधल्या त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळात काय करावे आणि काय करू नये याबाबत मार्गदर्शक सुचना देणारा आहे. शिष्यवृत्तीच्या औपचारिकतेची माहिती देणारा एक क्यूआर कोड प्रशासन विभागाच्या वतीने तयार केला आहे. या दोनही गोष्टी विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहेत.

आय. एम. एस. मध्ये उच्च दर्जाचे शिक्षण, उत्तम कंपन्यांसोबत असणारे संबंध, यामुळे नोकरीच्या भरपुर संधी मुलांसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळेच आय. एम. एस. संस्थेला मुलांचे प्राधान्य असल्याचे डॉ. विक्रम बार्नबस यांनी सांगितले. प्रशासन विभागाच्या वतीने केलेल्या या अभिनव स्वागताने देखील संस्थेविषयी आपुलकीची भावना निर्माण झाल्याची प्रतिक्रिया विद्यार्थी देतात.

## एमआयएम ही राष्ट्रवादी – भाजपची ‘‘बी’’ टीम

**धीरज हत्याकांडात पोलीस तपासाच लक्ष विचलित करण्यासाठी राष्ट्रवादीने बी टीम ॲक्टिव्ह केली : किरण काळे । ओवेसी, इम्तियाज, जगताप, कर्डिले, पडळकर, भंडारे एकाच माळेचे मणी**




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पोलीस तपासातून धीरज परदेशी हत्याकांडातील सत्य बाहेर आलं तर अहिल्यानगरच्या एका बड्या राजकीय नेत्यालाच त्यात आरोपी करण्याची वेळ पोलिसांवर येईल. त्यामुळे घाबरलेले ते बडे नेते पोलिसांच्या मूळ तपासाची दिशाभूल करण्यासाठी अहिल्यानगर मध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण व्हावा या करिता सुरुवाती पासूनच कमालीचे ॲक्टिव्ह आहेत. एमआयएम ही राष्ट्रवादी – भाजपचीच ‘‘बी‘‘ टीम आहे. दोघांनी ही तेल ओतून आग लावू नये. धीरजच्या मारेकऱ्यांना फाशी व्हायची असेल तर निष्पक्ष पोलीस तपास होणे गरजेचे आहे, असे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे यांनी म्हटले आहे.

धीरजच्या अंत्यविधीपूर्वी डीएसपी चौक येथे झालेल्या सभेत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी सभेतील वक्तव्यांवर कारवाईची मागणी एमआयएमने प्रशासनाकडे केली आहे. त्यावर आता ठाकरे शिवसेनेने टीका केली आहे.

किरण काळे म्हणाले, राष्ट्रवादी आमदारांचे नातेवाईक असणारे आणि त्यांच्याच पाठबळावर राष्ट्रवादी बंडखोर उमेदवार झालेले दत्ता पानसरे यांच्या नुकत्याच झालेल्या विधानपरिषद निवडणूक उमेदवारी अर्जावर सूचक झालेल्या एमआयएमचा पर्दाफाश यापूर्वीच झाला आहे. ज्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी आता एमआयएम करत आहे, तेव्हा त्यांच्याशीच त्यांनी अर्थपूर्ण राजकीय हात मिळवणी केली. ते आता राजकीय नौटंकी करत अहिल्यानगर वेठीस धरत आहेत.

महानगरपालिका निवडणुकीत मुकुंद नगरमध्ये एमआयएम नेते असदोद्दीन ओवेसी, इम्तियाज जलील यांच्या प्रचारसभा राष्ट्रवादीच्या स्पॉन्सरशिप वर झाल्या. निवडणुकीच्या राजकारणा करिता मतांचे ध्रुवीकरण करण्यासाठी ही आऊटडेटेड झालेली स्ट्रॅटेजी त्यांनी वापरणे बंद करावे. ओवेसी, इम्तियाज, जगताप, कर्डिले, पडळकर, भंडारे हे सगळे एकाच माळेचे मणी आहेत. जातीय, धार्मिक तेढ निर्माण करून अहिल्यानगर आणि महाराष्ट्र जर कोणी पेटवू पाहत असेल तर ते योग्य नाही. आता कुठे वातावरण निवळत असून समाजात शांतता आणि सलोखा असण्याची गरज असल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

त्यांचे कॉल डिटेल्स तपासा :

धीरज परदेशी हत्याकांड होण्याच्या काही महिने आधी आणि नंतर एमआयएम, राष्ट्रवादीच्या नेते, महत्त्वाच्या कार्यकर्त्यांमध्ये काही संभाषण झाले आहे का, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी त्यांचे सीडीआर, एसडीआरसह कॉल डिटेल्स तपासावेत. रात्रीच्या अंधारात भेटी झाल्याच्या देखील चर्चा आहेत. अहिल्यानगर अशांत करण्यासाठी जर कोणी षड्यंत्र रचत असेल तर अशांना पोलीस प्रशासनाने वठणीवर आणावे, अशी किरण काळे यांनी जाहीर मागणी केली आहे.

परदेशी कुटुंबीयांच्या पुनर्वसनावर त्यांचा ब्र नाही :

एसपी ऑफीस चौक सभा महाराष्ट्राने ऐकली. धीरजला न्याय मिळवून देण्यासाठी ती होती की राजकीय पोळी भाजून घेण्याचा आखाडा रंगला होता हेच समजत नव्हते. एकाही वक्त्याने धीरज परदेशीच्या कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी साधा ब्र सुद्धा काढला नाही. मुख्यमंत्री सहायता निधीतून ५० लाखांची मदत देण्याची मागणी आम्ही देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र पाठवून केली आहे. सत्ता हातात असून देखील मदत करण्याच औदार्य दाखवण्यासाठी त्यांची नियत साफ नसल्याशी सरकारवर किरण काळे यांनी टीका केली आहे.

जबरदस्तीने दुकाने बंद करणे चुकीचे :

बुरुडगाव रोड परिसरामध्ये जबरदस्तीने दुकानं बंद करण्यासाठी दुकानदारांना मारहाण करण्यात आली. कोतवाली पोलीस स्टेशन मध्ये तसा गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे ही दुकानं हिंदूंचीच होती. धीरजच्या दुर्दैवी निधना आडून शहरात काही बॅड एलिमेंट जर दहशत माजत असतील तर जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अधिक कठोर पावले उचलावीत, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

## इस्त्रोच्या श्रीहरीकोटा येथील अंतराळ केंद्रास विद्यार्थ्यांची प्रेरणादायी भेट

**‘केअर फॉर यू’ फाउंडेशनच्या ४३ विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव**



**श्रीहरीकोटा :** ‘केअर फॉर यू’ फाउंडेशनच्या वतीने १० ऑगस्ट २०२६ रोजी श्रीहरीकोटा येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीत महाराष्ट्रातील विविध बालसंगोपन संस्थांमधील ४३ विद्यार्थी आणि ३० स्वयंसेवक सहभागी झाले. भारताच्या अंतराळ संशोधनातील प्रगतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ही विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय संधी ठरली.

या पथकासोबत ‘केअर फॉर यू’ फाउंडेशनचे मुख्य सल्लागार तथा महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व विशेष पथके) कृष्ण प्रकाश राजमोहन प्रसाद, यांच्या विशेष उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली. यावेळी सीए प्रसाद भंडारी, ॲडव्होकेट कौवल्य कुलकर्णी, सिद्धार्थ गोंगडे, स्मिता सारडा आणि मधुसूदन सारडा आदी मान्यवर उपस्थित होते.

या संपूर्ण भेटीत विद्यार्थ्यांना ज्ञान, संवाद आणि प्रेरणेची अनोखी अनुभूती मिळाली. इस्रोमधील वरिष्ठ अधिकारी व शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. भारताच्या अंतराळ मोहिमांमागील मेहनत, अचूकता, शिस्त आणि समर्पण याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

**इस्रो अध्यक्षांशी ऑनलाइन संवाद**

या भेटीचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे इस्रोचे अध्यक्ष श्री. व्ही. नारायणन यांच्याशी बंगळूर येथून झालेला ऑनलाइन व्हिडिओ संवाद. आपल्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांचा हा संवाद विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला.

इस्रोतर्फे करण्यात आलेल्या सर्व व्यवस्थाही अत्यंत प्रशंसनीय होत्या. बस वाहतूक, निवास, भोजन आणि इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

**प्रक्षेपण केंद्र आणि नियंत्रण कक्षाला भेट**

विद्यार्थ्यांना श्रीहरीकोटा येथील पहिले व दुसरे प्रक्षेपण केंद्र तसेच नियंत्रण कक्षाला भेट देण्याची संधी मिळाली. भारताच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमा ज्या ठिकाणाहून पार पडतात, त्या अत्याधुनिक सुविधांची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोठी भर पडली.

**शास्त्रज्ञांशी सविस्तर संवाद**

या भेटीतील विशेष उल्लेखनीय भाग म्हणजे श्री. एन. कुमार, ग्रंथालय अधिकारी-ड, एलआयआरडी/ एमएसए, एसडीएससी-शार, इस्रो, श्रीहरीकोटा यांच्याशी झालेला सविस्तर संवाद. त्यांनी अत्यंत शांतपणे आणि सोप्या भाषेत अंतराळ विज्ञानातील अनेक बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांच्या संवादामुळे अंतराळ विज्ञानासारखा जटिल विषय विद्यार्थ्यांसाठी अधिक सोपा, रंजक आणि समजण्यासारखा झाला.

## देशाच्या जडणघडणीत कामगारांचा मोठा वाटा – अर्चना गुंद्रे

**युनिक्लिंगर कंपनी व अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेमध्ये तीन वर्षांचा कामगार करारनामा संपन्न नवीन कामगारांना सुमारे साडेबारा हजार, तर जुन्या कामगारांना सरासरी १६ हजार रुपयांची पगारवाढ**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर एमआयडीसी येथील युनिक्लिंगर कंपनी आणि अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटना यांच्यामध्ये कामगारांचा पुढील तीन वर्षांसाठीचा करारनामा खेळीमेळीच्या आणि सकारात्मक वातावरणात संपन्न झाला. कंपनी प्रशासन आणि कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर कामगार हिताचा हा करारनामा यशस्वीपणे पार पडला.

या करारनाम्यानुसार नवीन कामगारांना सुमारे साडेबारा हजार रुपयांची पगारवाढ, तर जुन्या कामगारांना सरासरी १६ हजार रुपयांची पगारवाढ मिळणार आहे. कंपनी प्रशासन आणि कामगार संघटनेमध्ये करारनाम्याची देवाणघेवाण करण्यात आली. कामगारांच्या हिताचा निर्णय झाल्याने कंपनीतील कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी युनिक्लिंगर कंपनीच्या सीओ अर्चना गुंद्रे, अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे, एचआर हेड योगिता शेट्टी, जनरल मॅनेजर दिनेश देव, जीवन चाबुकस्वार, प्लांट मॅनेजर प्रदीप रक्ताटे, युनियनचे सदस्य दादासाहेब सुद्रिक, आदिनाथ शेवाळे आदींसह कंपनीतील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी युनिक्लिंगर कंपनीच्या सीओ अर्चना गुंद्रे म्हणाल्या की, कामगार हा देशाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक असून कंपनीच्या प्रगतीमध्येही त्यांचा मोठा वाटा आहे. कंपनी प्रशासन नेहमीच कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्याचा प्रयत्न करते. त्याचबरोबर कामगार उत्पादन आणि गुणवत्तेकडे लक्ष देत असल्यामुळे कंपनीची प्रगती होत असते.

युनिक्लिंगर कंपनी आणि अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेमध्ये सकारात्मक चर्चा झाल्यानंतर कामगारांच्या हिताचा करारनामा करण्यात आला आहे. कामगार आणि कंपनी प्रशासन हे एकत्र असून, कामगारांच्या सुख-दुःखामध्ये कंपनी सहभागी आहे. आपण सर्वजण एकाच कुटुंबातील सदस्य असल्याची भावना ठेवून कंपनीला पुढे घेऊन जाण्यासाठी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

## मासखमन व ६० आठई तपस्यानिमित्त तप अनुमोदना व भक्तिसंध्येला जैन बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव येथील अंबिकानगर जैन स्थानकात तपस्यानिमित् आयोजित करण्यात आलेल्या भक्तिसंध्या व भावा कार्यक्रमाला जैन समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माने भारलेल्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थित भाविकांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळाली.

हा कार्यक्रम अंबिकानगर जैन स्थानक, केडगाव येथे जैन श्रावक संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री. पन्नालालजी बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.‘चलो झूम उठे भक्ती के धुन में वैदेही के संग’या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या भक्तिसंध्येत वैदेही बोरा यांच्या सुरेल भक्तिगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सुमधुर आवाजातील भक्तिगीतांवर भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग घेतला. संपूर्ण स्थानक परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

सौ. कविताजी संजयजी बाफना यांनी ३१ उपवासांची कठोर तपस्या पूर्ण व इतरही जणांनी तपस्या (उपवास)केल्याबद्दल समाजबांधवांकडून अनुमोदना देण्यात आली. जैन धर्मामध्ये तपश्चर्या, संयम आणि आत्मशुद्धीला विशेष महत्त्व असून, मासखमन ही अत्यंत कठोर तपश्चर्या मानली जाते. अशा प्रकारची तपश्चर्या करणाऱ्या साधकांच्या त्यागातून समाजाला संयम, श्रद्धा आणि आत्मिक शांतीचा संदेश मिळतो. त्यांच्या या तपश्चर्येचे उपस्थितांनी कौतुक करून त्यांना पुढील धार्मिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात एक उपवास, बेला, तेला तसेच त्यापुढील तपस्या करणाऱ्या तपस्वींचाही विशेष सन्मान करण्यात आला. तपस्या करणाऱ्या प्रत्येक साधकाचा गौरव करून त्यांच्या धार्मिक साधनेला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे कार्यक्रमाला केवळ भक्तिसंध्येचे स्वरूप न राहता तप, त्याग आणि संयमाचा गौरव करणारे स्वरूप प्राप्त झाले.

# गणरायाच्या आगमनाची चाहूल; अहिल्यानगरातील मूर्तिकारांची दिवस-रात्र लगबग

## आकर्षक रूपांना यंदा विशेष मागणी; श्रीराम, राधाकृष्णासह विविध रूपांतील गणेशमूर्तींना राज्यभरातून पसंती



गणरायाच्या आगमनाची चाहूल; अहिल्यानगरातील मूर्तिकारांची दिवस-रात्र लगबग, गणेश मूर्तींना अंतिम टप्प्यातील आकर्षक रंगकाम व सजावट करताना मूर्तिकार.. (छाया: श्रीनिवास बुरगुल)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विघ्नहर्ता गणरायाच्या आगमनाला अवघा एक महिना उरला असून, अहिल्यानगर शहरातील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये सध्या दिवस-रात्र लगबग सुरू आहे. गणेशोत्सवासाठी देशभरातील भाविक आतुरतेने वाट पाहत असताना, भक्तांच्या मनात घर करणारी आकर्षक मूर्ती घडविण्यासाठी शहरातील मूर्तिकार आणि त्यांचे सहकारी अहोरात्र मेहनत घेत आहेत. मातीला आकार देण्यापासून मूर्तीचे बारकावे, रंगकाम, अलंकार आणि अंतिम सजावट करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर मूर्तिकारांकडून कलाकुसरीची पराकाष्ठा केली जात आहे. विशेष म्हणजे या कामात पुरुषांबरोबरच महिलाही खांद्याला खांदा लावून सहभागी होत असून, गणरायाच्या मूर्तीला अंतिम टप्प्यातील रूप देण्यासाठी त्यांचीही मोठी मेहनत सुरू आहे.

यंदाच्या गणेशोत्सवासाठी अहिल्यानगरमध्ये विविध आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण रूपांतील गणेशमूर्ती साकारल्या जात आहेत. पारंपरिक रूपांबरोबरच पेशवाई गजमुख, राधाकृष्ण, श्रीकृष्ण, महादेव, चौरंगवाला, सिद्धिविनायक, लालबागचा राजा, चिंचपोकळीचा राजा यांसह मुंबईतील प्रसिद्ध गणेश मंडळांच्या धर्तीवरील मूर्तींनाही मागणी आहे. यंदा श्रीरामरूपी गणेश आणि राधाकृष्णरूपी गणेशमूर्तींना विशेष पसंती मिळत असल्याचे मूर्तिकारांकडून सांगण्यात येत आहे. बदलत्या आवडीनुसार भाविक आणि सार्वजनिक गणेश मंडळांच्या अपेक्षा लक्षात घेऊन मूर्तिकारांकडून विविध संकल्पनांवर काम केले जात आहे. एखाद्या देवतेचे रूप गणरायाच्या रूपाशी कलात्मक पद्धतीने जोडताना मूर्तीच्या चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांची रचना, मुकुट, दागिने, वस्त्र आणि हातातील आयुधे यामध्ये अत्यंत बारकाईने काम केले जात आहे.

वरद आर्ट्सचे मूर्तिकार शेखर गोका म्हणाले, ''गणेश चतुर्थी हा वर्षातून एकदा येणारा मोठा उत्सव आहे. या उत्सवासाठी आम्ही वर्षभर तयारी करत असतो. दरवर्षी भक्तांचा उत्साह, आवड आणि मूर्तीबाबतच्या अपेक्षा वेगळ्या असतात. त्यामुळे प्रत्येक मूर्ती घडविताना त्यामध्ये केवळ कलाकुसर नव्हे, तर भक्तिभाव निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न असतो. भाविकांनी मूर्ती पाहिल्यानंतर त्यांच्या मनात आपलेपणा आणि भक्तीची भावना निर्माण व्हावी, यासाठी प्रत्येक बारकाव्याकडे लक्ष दिले जाते. यंदा अनेक मोठ्या आणि आकर्षक मूर्ती तयार करण्याचे काम सुरू असून, अहिल्यानगरमधील गणेशमूर्ती महाराष्ट्रभर पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

# शासन आदेश निर्गमित करून शिक्षक व कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा - बाबासाहेब बोडखे

**१ जानेवारीपासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करा; शिक्षक परिषदेची शासनाकडे मागणी**
**केंद्राप्रमाणे राज्यातील शिक्षक-कर्मचाऱ्यांनाही लाभ देण्याची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केल्यानंतर महाराष्ट्रातील राज्य शासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही त्याच धर्तीवर वाढीव महागाई भत्ता लागू करण्याचे शासन आदेश तातडीने निर्गमित करावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे स्मरणपत्र महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच संबंधित विभागांना दिले आहे. केंद्र शासनाच्या निर्णयानुसार राज्यातील कर्मचारी व शिक्षकांना देखील १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता मिळणे अपेक्षित असल्याचे शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले.

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यात २ टक्के वाढ लागू केली आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये महागाई भत्त्याला विशेष महत्त्व आहे. दैनंदिन जीवनावश्यक वस्तू, शिक्षण, आरोग्य, घरभाडे, प्रवास आणि इतर खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असल्याने कर्मचाऱ्यांना मिळणारा महागाई भत्ता हा त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने एकमताने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक असल्याचे शिक्षक परिषदेने म्हटले आहे. केंद्र शासनाने वाढीव महागाई भत्ता लागू करून केंद्रीय कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे. त्याचप्रमाणे राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना वाढीव महागाई भत्त्याचा लाभ देणे आवश्यक आहे. राज्य शासनाने

**केंद्र शासनाने दि. १ जानेवारी २०२६ पासून केंद्रीय कर्मचाऱ्यांना २ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील राज्य शासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही १ जानेवारी २०२६ पासून वाढीव महागाई भत्ता लागू करणे न्याय्य आहे. राज्य शासनाने यासाठी तातडीने शासन आदेश निर्गमित करून शिक्षक व कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा. महागाईच्या वाढत्या परिस्थितीत हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या आर्थिक नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.**
**- बाबासाहेब बोडखे**
**(जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद)**

याबाबत कोणताही विलंब न करता तातडीने शासन आदेश काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे राज्याच्या शिक्षणव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शाळांच्या प्रशासकीय कामकाजातही त्यांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे त्यांच्या आर्थिक मागण्यांकडे शासनाने सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता असल्याचे शिक्षक परिषदेने नमूद केले आहे.

# राज्याच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपरी गवळीचा यशवर्धन राज्यात प्रथम!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गुणवत्तेने पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. तळेगाव ढमढेरे, ता. मावळ येथील कुमार जयसिंगराव ढमढेरे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा इयत्ता चौथीतील विद्यार्थी यशवर्धन दत्तात्रय थोरात याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तब्बल ३०० पैकी २९६ गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावून पारनेरच्या शैक्षणिक क्षेत्राचा लौकिक उंचावला आहे.

यशवर्धनच्या या उल्लेखनीय यशामागे पारनेर तालुक्यातील पळसपूर गावच्या मार्गदर्शक शिक्षिका सौ. जयश्री इघे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि



जिद्दीची कोणतीही कमतरता नाही, हे यशवर्धनने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे प्रोत्साहन आणि विद्यार्थ्याची मेहनत यांचा सुरेख संगम झाला की ग्रामीण भागातील विद्यार्थीही राज्याच्या पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवू शकतो, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे.

**''यशवर्धनने मिळवलेले राज्यातील प्रथम क्रमांकाचे यश हे केवळ त्याच्या कुटुंबाचा किंवा शाळेचा अभिमान नाही, तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत, यशवर्धनची कामगिरी त्यांच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. यशवर्धन आणि जयश्री मॅडम यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन.''**
**आ. काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी यशवर्धन थोरात आणि मार्गदर्शक शिक्षिका सौ. जयश्री इघे मॅडम यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पारनेरच्या मातीतील या गुरूशिष्याचा संपूर्ण पुणे जिल्ह्यासह राज्याच्या शैक्षणिक नकाशावर उमटलेला हा गुणवत्तेचा ठसा निश्चितच कौतुकास्पद असून, ''ग्रामीण पारनेरची गुणवत्ता पुणे जिल्ह्यातील मावळ तालुकाच काय तर संपूर्ण राज्यातही अव्वल ठरू शकते'' हा आत्मविश्वास या यशामुळे अधिक दृढ झाला आहे. यशवर्धनच्या या उज्ज्वल कामगिरीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# आर्य चाणक्यमध्ये अखंड भारत दिन साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथे अखंड भारत दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी शाळेचे माजी विद्यार्थी तथा नगरसेवक योगेश धुपे,युवा उद्योजक कृष्णा दहिवाळ,मनोहर नवले,नितीन देशपांडे आदींच्या शुभहस्ते भारत माता व स्वातंत्र्यलढ्यात तील क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विशेष म्हणजे भव्य अशी तिरंगा रॅली शाळेच्या परिसरात देखील काढण्यात आली होती.

अखंड भारत दिनाचे मार्गदर्शन श्रीमती गीतांजली शेवतेकर यांनी केले. याप्रसंगी शाळा व वर्ग स्तरावरती यश संपादन केलेल्या तसेच शिष्यवृत्ती, मंथन,बी.टी. एस. इत्यादी स्पर्धा परीक्षामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन -आभार प्रदर्शन विलास खर्डेकर आणि राखी धोकटे यांनी केले.

# संघर्ष प्रतिष्ठान आयोजित 'श्रावण स्पेशल' उपवास पदार्थ बनविण्याची स्पर्धा उत्साहात

**दोन मैत्रिणी, एक उपवासाचा पदार्थ; 'चांगला आहार, उत्तम आरोग्य'चा संदेश**
**खाद्यपदार्थ व्यवसायातून महिलांनी कुटुंबाला आधार द्यावा – किरणताई बारस्कर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रावण हा हिंदू धर्मातील पवित्र महिना असून या महिन्याला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. श्रावण महिन्यात नागरिक मोठ्या प्रमाणात उपवास करतात. उपवासाच्या काळात सकस आणि पौष्टिक आहार घेऊन उत्तम आरोग्य राखणे गरजेचे आहे. याच उद्देशाने संघर्ष प्रतिष्ठानच्या वतीने 'श्रावण स्पेशल' उपवास पदार्थ बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना किरणताई बारस्कर म्हणाल्या की, सकस आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांच्या व्यवसायातून महिलांना आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावता येऊ शकतो. गृहिणी म्हणून काम करताना महिलांना स्वयंपाकाची खरी आवड आणि विविध पदार्थ बनविण्याचे कौशल्य असते. याच कौशल्याचा उपयोग करून उपवासाचे खाद्यपदार्थ बाजारात आणत व्यवसायाची सुरुवात करता येईल.

अहिल्यानगर शहर हे खवय्येप्रेमी शहर असून नागरिकांना चविष्ट आणि दर्जेदार उपवासाचे खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा. आपल्या आवडीला व्यवसायाची जोड देऊन महिलांनी आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन किरणताई बारस्कर यांनी केले.

संघर्ष प्रतिष्ठान आयोजित या स्पर्धेसाठी माजी नगरसेविका शितलताई जगताप, किरणताई बारस्कर, धनश्री खरडे, दिपाली बल्लाळ, प्रियंका हौसिंग आदींसह स्पर्धक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी दिपाली बल्लाळ म्हणाल्या की, 'श्रावण स्पेशल' या आगळ्यावेगळ्या स्पर्धेत दोन मैत्रिणींनी एकत्र येऊन एक उपवासाचा पदार्थ बनवायचा होता. यामध्ये सासू-सून, आई-मुलगी, जावा-जावा, नणंद-भावजय, बहीण-बहीण किंवा खास मैत्रिणींना सहभागी होता येणार होते.

# वाचन मंदिर आणि वाचक यांच्यामधील ग्रंथपाल महत्त्वपूर्ण दुवा – डॉ. राजा ठाकूर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी समाजाची आणि पर्यायाने उगवत्या पिढीची जडणघडण करण्यासाठी ग्रंथालय ही आणि वाचक यांच्यामधील ग्रंथपाल हा महत्त्वपूर्ण दुवा असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी व्यक्त केले. वाचन चळवळीचे प्रणेते डॉक्टर एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित '' राष्ट्रीय ग्रंथपाल दिनी'' अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने नगर जिल्ह्यातील विविध वाचनालयातील ग्रंथपालांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी ते उपस्थित मान्यवरांना संबोधित करत होते.

यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, खजिनदार तनवीर खान,सहकार्यवाह राहुल तांबोळी, संचालिका शिल्पा रसाळ , कार्यक्रमाचे संयोजक किरण आगरवाल ,कवी चंद्रकांत पालवे,वाचनालयाचे ग्रंथपाल अमोल इथापे ,सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, आदींसह जिल्ह्यातील विविध वाचनालयाचे ग्रंथपाल उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.राजेंद्र ठाकूर यांनी ग्रंथपाल हे सातत्याने वाचकांची अभिरुची ओळखून ,त्यांची आवड ओळखून त्यांना पुस्तक वाचण्यासाठी प्रवृत्त करत असतात. त्यांना आवडणारी पुस्तके त्यांच्या हाती पडली तर निश्चितच वाचकांच्या विचारांच्या कक्षा रुंदावत जातात आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत होते. त्यामुळे ग्रंथपालाची भूमिका समाजाच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे'' डॉक्टर ठाकूर म्हणाले कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संचालिका शिल्पा रसाळ यांनी जिल्हा वाचनालय आणि त्यामधील कर्मचारी सातत्याने हे वाचन संस्कृती वाढवण्यासाठी करत असलेल्या अमूल्य योगदानाविषयी माहिती दिली.

कवि चंद्रकांत पालवे यांनी वाचन चळवळीविषयी माहिती देऊन सुजाण वाचकांना त्यांच्या आवडीची ग्रंथसंपदा उपलब्ध करून देणे त्याविषयी सातत्याने मदत करणे यामुळे वाचकांची पुस्तकांविषयीची ओढ वाढत जाते. खऱ्या अर्थाने ग्रंथपालांची ही भूमिका भविष्यातील सुदृढ समाज निर्मितीस प्रेरक असल्याचे ते म्हणाले.

यावेळी विविध वाचनालयातील ग्रंथपाला यांनी आपली मनोगत होते. व्यक्त केली मान्यवरांच्या हस्ते उपस्थित ग्रंथपाल श्रीमती रेणुका पालवे ,प्रा.संगीता निमसे, सौ स्वाती कडनोर, सौ .शीला बारावकर, सौ सुवर्ण बोरनारकर ,श्री संदीप नन्नवरे ,श्री अमोल इथापे, श्री.नितीन भारताल, सौ.भाग्यश्री पांढरे कुमारी पल्लवी कुक्कडवाल,सौ वर्षा जोशी श्री संजय गाडेकर, आर्यन मडुर, ओम केदारे,आदीचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा रसाळ, मान्यवरांचा सत्कार संचालक किरण आगरवाल तर आभार राहुल तांबोळी यांनी मानले.

(पान १ वरून)

## जायकवाडी धरण तिरंग्याच्या रोषणाईने उजळले!

सौंदर्यात भर घालत आहे. धरणावर पडणाऱ्या भगव्या, पांढऱ्या आणि हिरव्या प्रकाशामुळे परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, हे नयनरम्य दृश्य नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. मराठवाड्याच्या सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले जायकवाडी धरण स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंग्याच्या रंगात न्हाऊन निघाल्याने पैठणच्या वैभवात आणखी भर पडली आहे.

## जेऊर बायजाबाई येथे दीड लाखाचा मावा जप्त

सुगंधी तंबाखू असा एकूण एक लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयिताकडे चौकशी केली असता, हा अड्डा शशिकांत रामदास मगर (रा. जेऊर बायजाबाई) याच्या मालकीचा असून, यासाठी लागणारा माल जितू मालपाणी (रा. छत्रपती संभाजीनगर) याने पुरविल्याचे उघड झाले. सध्या हे दोघेही फरार आहेत. या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अहिल्यानगरमध्ये बँक कर्मचाऱ्यांची निदर्शने

या वेळकाढू धोरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी ही निदर्शने करण्यात आली. यावेळी पाच दिवसांचा आठवडा आमचा हक्क'', ''सरकारचा वेळकाढूपणा चालणार नाही'', ''आवाज कुणाचा... बँक कर्मचाऱ्यांचा'' अशा जोरदार घोषणा देऊन कर्मचाऱ्यांनी परिसर दणाणून सोडला.

सभेचे प्रास्ताविक अध्यक्ष कॉ. माणिक अडाणे यांनी करून आंदोलनाची मुख्य भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले कॉ. कांतीलाल वर्मा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सरकारच्या वेळकाढू धोरणावर कडक शब्दांत टीका केली व लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला.

या निदर्शनांमध्ये कॉ. संदीप सरोवरे, कॉ. सागर तनपुरे, कॉ. सचिन शिरसाठ, कॉ. प्रकाश कोटा, कॉ. शशांक नवले, कॉ. महेश पंडित, कॉ. समीर डांगवळे, कॉ. सुरज गाडे, कॉ. अमोल पवार, कॉ. कीर्ती जोशी, कॉ. अमोल बर्वे, कॉ. उमाकांत कुलकर्णी, कॉ. राजेंद्र बेरड, कॉ. पल्लवी लोखंडे, आणि कॉ. प्रतीक्षा गवळी यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. शहरातील अनेक बँक कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. जर सरकारने लवकरात लवकर पाच दिवसीय बँकिंगच्या प्रस्तावाला मंजुरी दिली नाही, तर आगामी काळात युएफबीयू च्या नेतृत्वाखाली तीव्र संपाचे हत्यार उपसण्याचा इशारा देण्यात आला. निदर्शनांचे सूत्रसंचालन कॉ. सुजय नळे यांनी केले व कॉ. उमाकांत कुलकर्णी यांनी आभार मानले.